# हॉटेल, रेस्टॉरंट्स असोसिएशनचे नाशिकमध्ये आजपासून अधिवेशन

## दिलीप वेंगसरकर यांच्या हस्ते उद्घाटन

**प्रतिनिधी** | नाशिक

हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया या संस्थेचे पश्चिम विभागीय अधिवेशन शुक्रवारपासून (दि. ७) पहिल्यांदाच नाशिकमध्ये होत आहे. उद्घाटन प्रसिद्ध क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांच्या हस्ते होईल. संस्थेचे १९ वे विभागीय अधिवेशन असून या निमित्ताने पश्चिम विभागातील हॉस्पिटॅलिटी उद्योगातील अनेक नामवंत व्यावसायिक नाशिकमध्ये येत असल्याची माहिती असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी यांनी दिली.

हॉटेल रॅडीसन ब्ल्यू येथे या अधिवेशनाचे उद्घाटन सायंकाळी सहाला होत आहे. विशेष म्हणजे, तीन वर्षांच्या खंडानंतर अधिवेशन होत असून त्यात अनेक हॉटेल व रेस्टॉरंटचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी , गुंतवणूकदार आणि उद्योगातील दिग्गज सहभागी होणार असून ते विविध विषयावर विचारमंथन आणि संवाद करतील. या अधिवेशनात हॉस्पिटॅलिटी उद्योगापुढील आव्हाने आणि असणाऱ्या संधीची माहिती, नवे तंत्रज्ञान व नव्या उत्पादनाची माहिती तसेच नेट्वर्किंगची संधी या अधिवेशनाने मिळणार असून पर्यटन क्षेत्रात महत्त्वाचे शहर असणाऱ्या नाशिकची निवड अधिवेशनासाठी केली आहे.

### तीन वर्षांत नामांकित हॉटेल्सचे आगमन

नाशिकमध्ये स्टार हॉटेल्सची संख्या वाढत असून गेल्या तीनच वर्षांत मेरीयट, रेडीसन ब्ल्यू, सयाजी यासारख्या हॉटेल्सचे शहरात आगमन झालेले आहे. नुकतेच युकेतील हॉटेल स्वीस ट्राफलगारची एंट्री झाली आणि १०० कोटींच्या गुंतवणुकीची घोषणाही त्यांनी केली आहे. याशिवाय टाटा च्या विवांता हॉटेलसाठी शहरातील दीपक बिल्डर ॲण्ड डेव्हलपर्स यांच्यासोबत करार झालेला आहे. सध्याचे गेट वे हे हॉटेल देखील टाटा समूहाच्या अगदी वरच्या श्रेणीतील ताजमध्ये रूपांतरित होण्याची चर्चा आहे, या पार्श्वभूमीवर हे अधिवेशन नाशिकमध्ये या क्षेत्रात नवी दिशा देणारे असेल.